# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**

**क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपील क्रमांक — ४६४/२०२१/अहमदनगर**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सलीम बाबुभाई पठाण<br>रा. बसस्टँडच्या पाठी मागे, वॉर्ड नं. ६, श्रीरामपूर,<br>ता. श्रीरामपूर, जि. अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा,<br>शाखाधिकारी,<br>मुळा धरण शाखा, मुळानगर,<br>ता.राहुरी, जि.अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २ | प्रथम अपिलीय अधिकारी तथा,<br>सहायक कार्यकारी अभियंता,<br>मुळा पाटबंधारे उपविभाग, राहुरी,<br>ता.राहुरी, जि.अहमदनगर | : | प्रतिवादी |

**ऑनलाईन सुनावणी दिनांक — ०६/०७/२०२२**

अपिलार्थी यांनी दि. ०६/०२/२०२१ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल दाखल केले असून त्यामध्ये त्यांनी माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी दि.०६/०७/२०२२ रोजी meet.google.com/fhj-unpw-wvk या गुगल मिट कोडद्वारे ऑनलाईन आयोजित करण्यात आली होती.

**सुनावणीसाठी उपस्थित-** सर्व पक्षकार उपस्थित होते.

अपिलार्थी यांनी दि. ०३/१०/२०२० रोजीच्या माहिती अर्जान्वये जानेवारी २०१८ ते दिनांक ०३/१०/२०२० या कालावधीतील आपल्या कार्यक्षेत्राअंतर्गत येत असलेल्या उपविभागा अंतर्गत उपरोक्त कालावधीत मुळा धरणावर करण्यात आलेल्या कामाची यादी देण्यात येवून (मंजूर कामाची) कामावरील खर्च कामनिहाय तपशील देण्यात यावा याबाबतची माहिती मिळण्याची विनंती केली होती. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, मुळा पाटबंधारे विभाग, अहमदनगर यांनी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता/अधिकारी मुळा पाटबंधारे उपविभाग, राहुरी यांना दिनांक १६/१०/२०२० रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांचा माहिती अर्ज माहितीचा अधिनियमातील कलम ६ (३) अन्वये वर्ग करुन त्याबाबत अपिलार्थीस अवगत केले होते. त्यानंतर सहायक कार्यकारी अभियंता, मुळा पाटबंधारे उपविभाग, राहुरी यांनी जन माहिती अधिकारी तथा शाखाधिकारी, मुळाधरण शाखा, मुळानगर यांचेकडे दिनांक २८/१०/२०२० माहिती अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ६ (३) अन्वये वर्ग केला व अपिलार्थीस त्याबाबत अवगत केले होते.

तद्नंतर अपिलार्थी यांनी दि. १९/१२/२०२० च्या अर्जान्वये प्रथम अपिल दाखल केले. सदर प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी घेऊन दि. १७/०२/२०२१ रोजी, निर्णय पारित करुन जन माहिती अधिकारी तथा शाखाधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिलेली असुन त्याबाबत अपिलार्थी यांनी दिनांक १७/०२/२०२१ लेखी निवेदन सादर करुन सदर प्रथम अपील निकाली काढावे अशी विनंती केल्याचे नमूद करुन प्रथम अपील निकाली काढले.

सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांना माहिती पुरविली असुन दिनांक १७/०२/२०२१ रोजी माहिती प्राप्त झाल्याबाबत लेखी पोच दिलेली आहे. तसेच अपिलार्थी यांनी नमुद केले की, जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १७/०२/२०२१ रोजी माहिती प्राप्त झाल्याबाबत लेखी निवेदनात माहिती अर्जाप्रमाणे अपेक्षित माहिती चर्चेअंती समक्ष पहायला मिळाली त्याबाबत तक्रार नाही.

सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, अपिलार्थी यांच्या दिनांक ०३/१०/२०२० रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती पुरविली असुन अपिलार्थी यांची कोणतीही तक्रार नसल्याने व अपिलार्थीस माहिती पुरविल्याची पोच आयोगास सादर केल्याने माहिती पुरविली असल्याचे स्पष्ट होते. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे दिसून येत नाही, ही बाब विचारात घेता अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाच्या कलम ७(१) अन्वये केलेली कार्यवाही योग्य असून प्रस्तुत अपिलात काहीही तथ्य नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक ४६४/२०२१/अहमदनगर निकाली काढण्यात येत आहे.

**(समीर सहाय)**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

**क्रमांक : रामाआ- नाशिक/द्वि.अ.क्र./४६४/२०२१/अहमदनगर ओ-** 2206 **दिनांक-** 19/10/2022